## निविदा अटी व नियम

कंत्राटदाराने कोरी निविदा प्रपत्रे विकत घेण्याकरीता करावयाच्या अर्जासोबत खालील बाबी सादर करणे आवश्यक आहे.

1. महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडील योग्य त्या वर्गातील नोदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत राजपत्रित अधिकाऱ्यांचे सांक्षाकंणा सह आवश्यक आहे तसेच मुळ नोंदणीप्रमाणपत्र दाखवणे आवश्यक आहे. विक्रीकर कार्यालयाने नोदंणी कर प्रमाणपत्र 11 (4) 1 ची सत्यप्रत राजपत्रित अधिकाऱ्यांचे साक्षांकणासह सादर करणे आवश्यक आहे.
2. कंत्राटदारांने EPF व ESI ची नोंदणीचे प्रमाणपत्र तसेच व (EMD) भरणा केलेली कागदपत्रे स्कॅन / छायांकित प्रत दाखल करणे बंधनकारक आहे.
3. निविदा धारकाने कोरी निविदेची किंमत (Tender fee) व इसारा रक्कम (EMD) ची रक्कम ऑन लाईन / पेमेंट गेटवे व्दारे भरणा करावी.
4. पहिल्या लिफाप्यात कागदपत्रे योग्य असल्याची खात्री झाल्याशिवाय दुसरा लिफाफा उघडण्यात येणार नाही व त्याबाबत निविदाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
5. निविदाची ऑफर निविदाधारकास 90 दिवस बंधनकारक राहील.
6. प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी निविदा समितीसमोर उघडण्यात येतील.
7. सदरील कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित झाल्यापासुन निविदेत दर्शविलेल्या कालावधीच्या आत काम पुर्ण करावे लागेल. दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास निविदा अटीप्रमाणे दंड लावण्यात येईल. कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
8. कामाचे अंदाजपत्रक, नकाशे कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:स्सारण विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळुन पहावयास मिळतील.
9. इतर नियम व अटी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या सुचना फलकावर तसेच कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जल नि:स्सारण विभाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल..
10. मलनिस्सारण देखभाल दुरुस्ती करीता लावण्यात आलेले मजूरांचे सुरक्षीतते बाबतची सर्व दक्षता सर्व श्री कंत्राटदारावर राहील.
11. काम सुरु करण्यापूर्वी, काम सुरु असतांना व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो काढावे. सदरील फोटो कार्यालयाकडे

    सादर करणे बंधनकारक आहे.
12. देखभाल दुरुस्तीच्या काम अंतर्गत स्क्रॅप्स मटेरीयल कार्यालयात जमा करावे लागेल अन्यथा देयकातुन 5 % रक्कम कपात करण्यात येईल.
13. देखभाल दुरुस्तीच्या कामाचे देयक न मिळण्याच्या सबबीवर कामे थांबविल्यास कंत्राटदार हा दंडास पात्र ठरेल.

**कार्यकारी अभियंता,**
**पाणीपुरवठा व मलनिस्सारण विभाग,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**